# इंडियन क्रो



## सुधीर मराठे

# इंडियन क्रो

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# इंडियन क्रो

सुधीर मराठे

ई साहित्य प्रतिष्ठान

# इंडियन क्रो

## लेखक : सुधीर मराठे
A/६०४, श्रमसाफल्य ,
वायशेत पाडा,
कुरार गाव ,मालाड (पूर्व),
मुंबई-४०००९७
मोबाईल नं : ९८६९६६३९८९
Email:sudhirmarathe102@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन :३१ मार्च २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईत्य साहि- प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

माझे वडील कै .श्री .रघुनाथ स मराठे यांस अर्पण



# मनोगत



कांदिवलीत रोटरी क्लबच्या वाचनालच्या मराठी विभागातून बरीच पुस्तके विकत घेतली. तिथूनच वाचनाची आवड निर्माण झाली. पु ल देशपांडे, रणजित देसाई,गंगाधर गाडगीळ ,आचार्य अत्रे आदी मान्यवरांची पुस्तके वाचली. जंगल बुक आणि वाचलेल्या अनेक कथा ह्यातूनाच हि कथा लिहिण्याला प्रेरित झालो.

हि कथा लेखनाची सुरवात आहे. प्रथम इ-साहित्यचे आभार. त्यांच्या पाठिंब्याशिवाय आणि मार्गदर्शनाशिवाय माझं पहिली कथा प्रकाशित होणे शक्य नाही. हि कथा मी दहा वर्षांपूर्वी लिहिली होती.. सवडीप्रमाणे ती वर्ड फॉर्म मध्ये आणली. इ -साहित्यची पुस्तकं वाचल्यानंतर ती त्यांच्याकडे पाठवली.

लहानपणापासून शहरात राहिलो असलो तरी बदलेले शहर डोळयासमोर आहे. वास्तव आणि कल्पित अशी हि कथा आहे. बदलेल्या शहरी जीवनाचा परिणाम पक्ष्यांवर हि झालाय. नेहमी दिसणारा कावळा हाच ह्या कथेचा नायक आहे. नोकरी करता करता हा एक छन्द जपण्याची हि एक धडपड. आपल्या प्रतिसादावर बरेच काही अवलंबून आहे मित्रांनो.

श्री सुधीर र मराठे ,

A/६०४, श्रमसाफल्य ,

वायशेत पाडा , कुरार गाव ,मालाड (पूर्व),

मुंबई-४०००९७

मोबाईल नं : ९८६९६६३९८९

Email:sudhirmarathe102@gmail.com



# इंडियन क्रो

इंडियन क्रो

त्याची अधाश्यासारखी नजर आणि चंचलतेने फिरणारी मान अश्या, केविलवाण्या अवस्थेनेच  ह्याचे वर्णन करता येईल. नेहमीच हा अस्थिर असतो.

एकदमच  वर्णन करायला एका रंगाचा आधार. हा आपला काळा पण आपला मित्र कळुटा जादुगार पण खरा पक्षी भारतीय वाटणारा.

शहरात गावात कुठेही दिसणारा. जागतिक पातळीवर ह्याला संबोधतात  इंडियन क्रो.

कावळयांचे गीत-

एक होतो मी, एक आहे मी
कोणालाही नाही कळणार
आहे तरी कसा मी
एका रंगाचा काळोखात न कळणारा
खिडकीतून हाक मारणारा
हूल देताच पळणारा
लगबगीने बघणारा.

हा, पण ही तर माझी बाहेरील ओळख, पण माझ्या  इतका कोणालाही इतिहास माहिती नसणारच  आणि  पुराण जाणणारा  मीच तो इंडियन क्रो!

कावळे  गाणे गात एका झाडावर धडकतात आणि अचानक एक भयंकर कावळा येताच सगळे घाबरून पळ काढतात.

हाच तो इंडियन क्रो आणि ह्याचीच आहे ही कहाणी...............

भाग- १

दोन लहान पिल्ले लपून इंडियन क्रोकडे  बघतायत.
बाळु- हा दिसायला आपलाच वाटतोय
काळू - अरे वाटतोय पण. थकलाय बघ.
बाळु- बाहेरून आलेला दिसतोय.

आणि पटकन तो भयाण कावळा, इंडियन क्रो त्यांच्या समोर येतो

“तुम्ही नाही ओळखणार मला. तुम्ही माझ्या पेक्षा थोडे उजळ दिसताय.

कारण मी तुमच्या पिढीतला नाही. मी त्या पलीकडच्या  जंगलातून आलोय”

बाळु: मला तर ह्याच्याशी बोलायची भीती वाटतेय

काळू : थांब काहीतरी विचारूया. घ-घाबरू नको.

बाळु: काय विचारूया. मी ऐकलय जंगल खूप भयाणक असते आणि त्या जंगलात राहणारे खूप भयंकर असणारच.

काळू : ठीक आहे. तुम्ही खूप थकलेले दिसताय. या मी तुम्हाला त्या कारंज्यापाशी नेतो.

तिथे तुम्ही तुमची तहान भागवा आणि तुमच्या मार्गाने जा.

इंडियन क्रो : “मार्ग. मी इथेच इकडेच आलोय. आधी या शहराला समजावून घ्यावे लागेल. " मनात पुटपूटत....

"तुम्ही जा. मी पुढे जाईन. आभारी आहे. मुलानो. ”

भाग-२

एका घरात मुलगा आणि  वडील

लहान मूल : पापा, हे इथे काळे पक्षी काय करतायत.
पापा : अरे हे कावळे आहेत. हे असेच फिरतात.
एका कावळयाचं  लक्ष जात आणि  बाजूच्या कावळयांना म्हणतो
“अरे ह्या माणसांना काय कळणार सभा का फक्त ह्यांच्याच होतात का!”
काळू  / बाळु ” अरे संध्याकाळी सभा!  सगळे आक्रमणाच्या पवित्र्यात दिसतायत. ह्यांची घर  वैगेरे पडली  नाहीत ना. ”
“ कुणाचं रे”
“अरे आपण पण त्या कोकिळा मावशीच्या घरातच ”
“कसली कोकिळा आपण आपल्या प्रांताचे राजे. घर कोणाच असेना ”
अरे तिथे बघ  त्याच्या मागे लागलेत सगळे”
“तो बुजुर्ग, आपल्याला भेटलेला. ”

सगळे कावळे ओरडतात”परप्रांतीय आक्रमण”

“काळू ”
बाळु पुटपुटतो “मला वाटतंय हा काहीतरी सांगायला  आलाय त्या जंगलातून. नाहीतर एकटा कश्याला येईल. ”

काळू आणि  बाळु उठत इशारा करून बुजुर्ग कावळयाला  घरात जायला सांगतात.

बुजुर्ग कावळा खिडकीतून  एका घरात घुसतो.
बाहेर कावळे शोधत आहेत.

काळू  आणि  बाळु “अरे तो आता सुरक्षित आहे कारण तो आपल्या मित्राच्या घरी आहे. ”

“मी दोस्ती केली. त्याने दोस्ती केली. मी दोस्त तो दोस्त. हा हा… .. ”

म्हणत संध्याकाळ झाल्याने सगळे निघून जातात.

भाग- ३

कावळा कपाटाखाली जाऊन लपतो.
आणि छोटा दोस्त त्याला हाक मारतो.
कावळा बावरतो.
छोटा दोस्त : “मी तुला बघितलं. तू बाहेर ये. इथे आता कोणी येणार नाही.
मला सांग का लपलास? ”

इंडियन क्रो “ते बाहेर सगळे मागे लागलेत म्हणून”

“मी इथे आलोय माझ्या स्वकीयाना परत घेऊन जायला. त्यातिथे दूरवर त्या जंगलात.
खरं तर तिथेच त्यांचे अस्तित्व आहे. आमचं जंगल खूप सुंदर आहे. आम्ही सगळे तिथे खूप मजेत राहायचो. ”

जंगल गीत:

आमचं जंगल, आमचं जंगल
आमचं जंगल आहे इथे.
सगळे पक्षी झाडावर  राहातात  इथे
इथे आहे सगळी मस्ती मजा

पावसात आम्ही घर बांधत नाही
राहायची सोय इथे कमी नाही
ह्या फांदीवर त्या फांदीवर
नाहीतर आहे आमची कोकीळाताई

आम्हाला नाही इथे कोणाची भीती
वाघोबाच्या  शेपटावर  मी बसतो
रेड्याच्या शिंगावर  मी बसतो
हत्ती आमच्यावर खूप चिडतो
खारूताई आहे इथे खूप चपळ

कोल्होबा खूपच कपटी
त्याच्याजवळ कोणी जातच नाही

आमचं जंगल आमचं जंगल”
छोटा दोस्त: खूप मजा आली
बाहेरून आवाज येतो
“बाळा बाहेर ये. ”
छोटा दोस्त दरवाजा बंद  करून बाहेर जातो.

इंडियन क्रो  “आजची रात्र इथेच  काढावी लागेल. इथेच  मी सुरक्षित आहे. ”

भाग- ४

सकाळ झाली. चिमण्यांच्या चिवचिवाटाने आसमंत दुम्दुमुन गेला होता.

मध्येच काव काव चा आवाज येत होता.

अचानक कावळयांचे गीत कानावर आले आणि इंडियन क्रो जागा झाला.

“एक आहे मी, हे आम्ही दोघे
आहोत आम्ही सगळे एक
पण कोणालाही नाही कळणार मी कोण
आम्ही  कावळे, पाठवलय देवाने आज
सगळयाना सकाळी जागवायला”

इंडियन क्रो: अरे! हे आपल्या जंगलातल गाणं.
म्हणजे आपली जमात इथेच कुठेतरी आहे.
दानव, भूत, देव, शिकारी सगळे इथे  आहेत.
मला आठवतय आम्ही किती शोर्याने लढलोय ते!”

“आम्ही शूर, दु: ख करू दूर,
दानवांचा या जगात आहे पूर,
कोणालाही घाबरायाच नाही
कारण आहोत आपण आहोत देवाचे
सैन्य आपले मोठे,
दानव आहेत खोटे”

सगळे सैनिक झाडावर  जमायचे.
जंगलात आमचं साम्राज्य  कायम होतं. ”

खिडकीतून इंडियन क्रो बाहेर निघून जातो.

खूणगाठ म्हणून  झाडावर टीक टीक करून खूण करतो.
झाडावरून खाली येऊन काळू, बाळु नमस्कार करतात.
इंडियन क्रो”तुम्ही तिकडेच राहाता ”

काळू ” हा, त्या पलीकडे. दिवसा आम्ही कुठेही फिरतो पण रात्री इथे !“

इंडियन क्रो” इथे कावळे बघून थक्क झालो. ”

काळू ” तुमच काम झालं का?”

इंडियन क्रो” नाही”

इंडियन क्रोचं लक्ष्य एका मोठ्या चित्राकडे जाते. फूंक चित्रपटाचं भलं मोठं  पोस्टर असते.

त्यावर एका कावळ्याचे चित्र असतं. त्या चित्रावर कावळे हल्ला चढवतात.

इंडियन क्रो “बाहेरच्यांना खपवून घेत नाहीत वाटत. खूप मजेशीर आहे”

अचानक इंडियन क्रोची नजर बाजूला जाते. त्याला सगळया कावळयांनी घेरलेल असतं.

कावळे “ए पकडा त्याला सोडू नका. कुठन आलास, काय पाहिजे तुला.

आणि त्या लहान मुलांना काय सांगतोस”

दुसरा ” ह्याची मस्ती जिरवुया”

तिसरा” म्हातारा दिसतोय”

कावळयांचा एक ग्रूप तिथे येतो- आम्ही शूर, दु: ख करू दुर.....

लीडर: “सोडा त्याला”

मोठा: “आज सोडतोय, पण लक्ष ठेवा. ”

आणि निघून जातो.

लीडर ”बुजुर्ग दिसताय. जंगलातून आलाय का”

इंडियन क्रो ”हो”

लीडर” वाट चुकलाय का. “

“काहीतरी सांगतोय का बघा. ”

“किती दिवस मुक्काम. ?”

इंडियन क्रो “बघू. ”

लीडर “ठीक आहे. मदत लागली तर सांगा. ह्या मुलांबरोबर असाल तर सुरक्षित समजा”

आणि निघून जातात” आम्ही शूर, दु: ख करू दूर ..... ”

भाग- ५

इंडियन क्रो "हे शहर खूप मोठे दिसतंय. पण हे बघायला कोणाच्यातरी मार्गदर्शनाची गरज लागेल. ह्या मुलांना विचारूया. "मला हे शहर बघायचे आहे. तुम्ही दाखवाल का?

काळू" हो आमचा पर्यटन काका तुम्हाला मदत करेल. चला तर."

पर्यटन काका : "या मी इथे आहे तयार. नवीन पाहुणे बघणार आहे शहर. "

"चला तर"

"हे आहे आमचे मुंबई शहर,
इथे आहे माणसांचा कहर,
माणस धावत असतात तिन्ही प्रहर"

"हे आहे शहराचे प्रवेशद्वार,
गेट वे ऑफ इंडिया
हां घाबरू नका,
काही तरी चमकलं ना डोळ्यासमोर,
तो फोटो फ्लॅश,
आपल्यासाठी नाही हा,

त्या कबुतर दोस्तांसाठी  हो
इथे थांबा  आणि पाण्यावर मस्ती करूया”

बच्चे “ काय मजा येतेय”

इंडियन क्रो” खूप मोठा किनारा ह्या शहराला  लाभला आहे.
खूपच छान. ”

पर्यटन काका” इथून पुढे गिरगाव चौपाटी, मग मलबार हिल, वरळी, दादर चौपाटी, माहीम, बान्द्रा असा समुद्रा किनारा खूप दूरवर आहे. ”

“आणि ही आहे गुहा हळू, आत चला वाटवाघळ झोपली आहेत सांभाळून. त्याना चाहूल लावू देऊ नका. ”

.

“आणि आपल घर आल. बघा हे नॅशनल पार्क इथून पुढे  जंगलाची सुरवात.
चला संध्याकाळ झाली. आणि आपली सहलही  संपली. ”

इंडियन क्रो”मी इथे थांबेन आज”

बच्चे “पण जरा जपून हा. आम्ही जातो आता”

इंडियन क्रोला आता जुन्या गोष्टी आठवायला लागतात.

" त्या प्रचंड प्राण्यांनी मला इथपर्यंत आणले होते. आणि मी ते प्रचंड रूप मी धारण केलं होतं. ते तेजस्वी रूप माझ्या बरोबर संपावं अशी माझी इच्छा नाही.

ही परंपरा पुढे चालली पाहिजे"

झाडावर बसलेल्या घुबडाची नजर इंडियन क्रोवर गेली आणि ते घुबड ओरडु लागले.

तसा लगबगीने इंडियन क्रो सावध झाला आणि खूण ठेवलेल्या बिल्डिंगच्या खिडकीपाशी आला.

घुबडाच्या त्या आवाजाने वटवाघळे झाडावर येऊन लटकली आणि झाडावर धांदल उडाली.

वटवाघळे "हे घुबडा तू का ओरडलास. "

घुबड" एक विचित्र कावळा बघितला"

वटवाघळे "कुठून आला आणि कुठे गेला"

सगळे झाडावरचे कावळे ही बाहेर आले.

तसे वटवाघळे आणि घुबडांनी पळ काढला.

भाग-६

सैनिक कावळयांची सभा सकाळ झाल्या झाल्या भरली.

लीडर" कालच्या  रात्रीच्या प्रकाराने  आता आपल्या सगळयाना सावध  रहावं लागेल.

काहीतरी विचित्र  होत आहे. "

आपल्याला लहान पिल्लाना  प्रशिक्षण  दयावे लागेल. कोणीतरी शिक्षक  पाहिजेय.

मला वाटत तो जंगलातून आलेला कावळा आपली मदत  करेल. कारण ज्या कामासाठी तो इथे आला आहे ते होई पर्यंत तो थांबेल.

जंगलातल्या बऱ्याच सवयी  आपण  विसरलो आहोत"

कावळा "पण त्यांना तयार कोण करणार. आणि तोच शत्रू असेल तर"

लीडर: "नाही. त्याची पारख मी केली आहे. त्याची नजर सांगतेय तो आपल्याला मदत करेल. त्याच्या बरोबर असणाऱ्या त्या दोन मुलाना पुढे करून तयार करा. "

पण घुबडाने हा प्रकार ऐकला आणि सभेची माहिती वटवाघळांना पोहचवली.

आणि त्यांनीही रात्रीची सभा घ्यायचे  ठरवले.

वटवाघूळ " मित्रांनो खूप विचित्र सभेची माहिती कानावर आलीय आणि आता आपल्यालाही रात्री भरपूर काम करायला लागेल. "

सगळी वटवाघळे एकत्र लटकत  म्हणायला लागली"

"च्छु मंतर च्छु..

जंतर  मंतर जादू करूया
सगळयात सरस आपण ठरुया
काळोखाचे आपण राजे
सगळेच पळतात बघून डोळे मोठे

जंतर  मंतरचे आम्ही राजे

च्छु मंतर च्छु.... वटवाघळे "

भाग- ७

उंचावरून  आकाशातुन एक पक्षी झडप घालून
खाली उतरून एका  उंच  डोंगराच्या सुळयावर  बसला.
आणि गर्जना केली”
मी पक्षांचा  राजा आहे. राजा नाही महाराजा”

घारी  त्याच्यासमोर बसल्या.

“ एक विचित्र कावळा  आलाय ही खबर  कोणी आणली.

त्याला तिथेच संपवायला का तुमचे  पंजे शहरात खीरट्या मारुन कमजोर झाले आहेत .

बोला ! आवाज का येत नाही. आणि राजाच्या परवानगी शिवाय तो शहरात  ह्याच डोंगरातुन  शिरलाय. ”

घार -” कावळयांनी त्यांना मदत केली”
गरूड राजा” आणि त्या फितूर कावळयांनी का मदत  केली”
अचानक सुरुंगाचा आवाज झाला. सगळे हादरले.

गरूड राजा “बघा माणसे हा डोंगरे पोखरून आपला सर्वस्व संपवत आहेत तरी आपण गप्प.

आणि आता हे कावळे ही आपल्याला  सांभाळता येत नाहीत.

माझं  राज्य  संपेल त्या आधी हे कावळे संपतील. "

काही  वर्षांपूर्वी असाच एक कावळा  आडवा आला होता.

तोच तर नसेल या शंकेने गरूड राजा विचार करू लागला.

गरूड राजा” एका साधुने आम्हाला,

त्या जंगलात साधुने आम्हाला शक्ति दिली होती संकटकाळी वापरायला.

मी ती त्याच्या विरोधात वापरुन काटा काढला तर हा शूद्र आडवा आला होता.

तो निघून गेला होता पण आता कसा परत येईल. ”

भाग- ८

बदके पाण्यात तरंगत आहेत.  कावळे त्यांना त्रास देत आहेत.
हे सगळे बघून इंडियन क्रोला जंगलाची आठवण आली.

इंडियन क्रो : "माणूस सर्व शक्तिमान आणि बुद्धिमान आहे. आपल्याला अशा माणसाला शोधाव लागेल.
जो दुसऱ्यांसाठी, जंगलासाठी आपल्या शक्तिचा वापर करेल.
कारण  मनुष्य नसल्यामुळे आपण ही शक्ति पुरेपूर वापरत नाही आहोत. "

आपण आज पासून कावळयांच्या प्रशिक्षणाला सुरवात करूया.
सगळे कावळे  जमले आहेत.
समोर इंडियन क्रो उभा आहे.
इंडियन क्रो"सगळयानी सरळ रेषेत उभे राहा.
दोन पावले पुढे जा.
दोन पावले मागे या.
संकटकाळी इशारा देताना कसे ओरडाल.
बोला"कककककक्कक्कक्क्कक्कक्क्कक्क.. "
"मस्त आवाज  हे चालू ठेवा. "

चला जाता जाता तुम्हाला एक गोष्ट सांगतो.
"माणसा एवढं ज्ञान प्राण्यांना नाही.

पण सर्व शक्तिमान माणूस आहे कारण त्याच्याकडे विचार करायला बुद्धी आहे.

तेवढी आपल्याकडे नाही. ”

“गुरू शिष्याच्या गोष्टी.

मी तुमचा शिक्षक म्हणजे गुरू आणि तुम्ही शिष्य .

तुम्ही मी शिकवलेल ज्ञान घेऊन  त्याच पालन करा म्हणजे तुम्ही सुरक्षित आणि चांगले राहाल”

“आजचा अभ्यास इथेच संपला. ”

सगळे निघून गेले आणि इंडियन क्रो आपल्या आठवणीत  रंगून गेला.

भाग - ९

ऋषि मुनी तपश्चर्या करीत आहेत आणि गिधाडे त्यांच्या तपश्चर्येत भंग करण्याचा प्रयत्न करीत आहेत. कावळे आश्रमात राहत असल्यामुळे ऋषीच्या रक्षणासाठी सज्ज झाले.

ऋषीच्या तपश्चर्येने त्यांच्या समोर हिरा प्रगट झाला . ऋषि तपश्चर्येत मग्न आहेत. तो हिरा पळवण्याच्या प्रयत्नात गीधाडे आहेत”

सैनिक कावळा ऋषि समोर येतो

ऋषि”माझी ही तपश्चर्या अशीच चालू राहणार आहे. माझं रक्षण तुम्ही करावं ही विनंती. ”

कावळे ”ऋषि महाराज हा हिरा तुम्ही परिधान करावा म्हणजे तो कोणीही हिरावून घेणार नाही. ”

ऋषि”माझी तपश्चर्या संपेपर्यंत तुम्ही तो सुरक्षित ठेवा. ”

सैनिक “पण इथे कसा सुरक्षित राहणार”

ऋषि”तुम्ही अशा जागी ठेवा की तो सुरक्षित राहील”

सैनिक”

पण जर हा हिरा असाच पडून राहणार असेल तर त्याच प्रयोजन काय”

ऋषि ”हा हिरा ज्याच्या हाती लागेल तो शक्तिमान बनेल पण त्याचा दुरूपयोग झाला तर निष्प्रभ होईल. एवढेच, मी काही सांगणार नाही. ”

कावळा विचार करीत असतो. आकाशात उंच उडणाऱ्या गरूडाकडे लक्ष जाते.

गरूड समोर येते “मी मदत करू “

साधू ”आम्हाला अशी जागा दाखवा की हा हिरा सुरक्षित ठेवता येईल.

कावळा मनात  म्हणाला ” आम्ही दोघे बोलत असताना हा अचानक कुठून आला. ”

गरूड उडून गेला. आणि कावळयांची  फौज जागा शोधू लागली.

भाग-१०

कावळे  एका झाडाच्या ढोलीत  घुसणार
तेवढ्यात  एक साप बाहेर येतो.
सगळे कावळे  “पळ.... पळा.... ”

चला तो बघा तिकडे तलाव.
कावळयांच लक्ष बदकांकडे जात  आणि बदकांची मस्ती सुरू होते.
दोन कावळे  दोन्ही  बाजूनी बदकांना उचलतात ”अ.. बदक उडतात बघा बघा. ”

एक निमुळती शेपटी पाण्यावर बघताच सावध होतात.
पाण्यात डुबकी मारतात.
आणि लगेच वर येतात ’
अरे पळ  बाहेर “ आत मगर आहे”

"चला गुफेत जावूया. "
आत जाताच गुफेतुन  वटवाघळांचं  झुंडच्या झुंड बाहेर येतो. ’

"जमिनीत पुरूया तरी कोणतरी  घेऊन जाईल. मग करायचं तरी काय"

इंडियन क्रो मनातल्या मनात पुटपुटला “जागा सापडणे कठीण झालं आहे”

गरूडाने हाक मारली “सैनिक कावळयां तू चल. ”
सैनिक कावळा : “आज नको. साधुमहाराजांची परवानगी महत्वाची आहे. ”

आणि निघून जातो.

सैनिक कावळा महत्वाच्या सहकाऱ्यांना बोलावतो आणि उद्याच्या गरूड भेटी बद्दल सगळयांना माहिती देतो. ”

तुम्ही ह्या साधुमहाराजांचे रक्षण करा. तो तेजस्वी हिरा गरूड राजा पळवून नेण्याचा प्रयत्न करेल. “

पिल्लू” तुम्ही त्या साधुमहाराजांचे रक्षण करीत आहात?”

इंडियन क्रो ”मुला हे काम तुलाही करायचे आहे. त्या साधू महाराजांमुळे आपण ह्या जंगलात शांततेने  राहत आहोत. ते इथे एकटेच आहेत. ”

पुर्वी गिधाडे आपल्याला खूप त्रास द्यायची. आपली अंडी फोडायची. सापांचा संचार होता. म्हणून गरूडाचे  हल्ले व्हायचे. खूप अराजकता होती.

साधू महाराजांच्या आश्रमामुळे सगळे शांत आहे.

पण आता साधू महाराज एकटे आहेत कारण त्यांच्या बरोबरचे साधू शहरात निघून गेले. साधुमहाराजांची तपश्चर्या पूर्ण झाली ती आपल्या मुळेच.

जंगलाचे नियम जपले  तर सगळे शांत  राहू शकतात.

आश्रमा बाहेरच जग वेगळे आहे.

“म्हणजे गरूड, गिधाड, वटवाघळे वैगरे.

आश्रमाबाहेरचे सगळे प्राणी आणि पक्षी क्रूर आहेत. आश्रमाबाहेरचे कावळे  देखील.”

भाग-११

सकाळी गरूड राजा इंडियन क्रोला घेऊन बाहेर निघाला.

गरूडा बरोबर इंडियन क्रो बेचैन  होता, त्याला काही गडबड होणार अस सतत वाटत होते.

इंडियन क्रो" गरूडा, आपण कुठे चाललो आहोत "

गरूड" मी तुम्हाला पाहुणचार   देणार आहे"

इंडियन क्रो गडबडला आणि हळू  उडू लागला.

इंडियन क्रो "मी उंचावर उडू शकत नाही. मला थांबायला लागेल."

गरूड: "चला त्या डोंगरावर  माझं  घर आहे तिथे. "

गरूड राजाच्या घरा  जवळ आल्यावर प्रकाशमान  हिरा इंडियन क्रोला दिसला.

इंडियन क्रोवर मागून गिधाडे  हल्ला करतात. इंडियन क्रोचे पंख कापण्यात आले पण त्या हिऱ्याच्या  रहस्या अभावी गरूड राजा त्याला मारू शकत नव्हता.

गरूड आणि गिधाडांनी सगळ्या कावळयांना जंगलातून पळवून लावले आणि कावळे  जंगले सोडून शहराकडे धावले.

गरूड राजा आता जंगलात ताकदवर  झाला.
इंडियन क्रो त्याच्या कैदेत होता.
एक दिवस एका मित्र गरुडाच्या मदतीने तो हिऱ्याजवळ पोचला आणि चमत्कार झाला
आणि त्या कावळयांचे प्रचंड पक्ष्यात रुपांतर झाले.
मुकुटात हिरा परिधान केलेला इंडियन क्रो.

आणि इंडियन क्रो गरूड राजाच्या कैदेतून बाहेर पडला.

इंडियन क्रोने स्वत: ला तलावाच्या पाण्यात बघितल, स्वत:चं ते प्रचंड रूप.
आणि पुन्हा स्वत:चं जुने रूप आठवून पुन्हा कावळयांच्या रूपात आला.

इंडियन क्रो पुन्हा आपल्या जंगलात आला तिथे असणाऱ्या प्राण्यांजवळ विचारपूस केल्यावर कळलं की कावळे  खूप वर्षापूर्वीच जंगले सोडून गेलेत.

इंडियन क्रो आल्याची चाहूल तिथे असणाऱ्या घारीना लागली, तस इंडियन क्रो आपली रूप बदलत मुंगी-उंदीर-ससा-आणि प्रचंड गिधाड झाला. आणि आकाशात उडाला.

इंडियन क्रो पळून गेल्याची खबर गरूड राजाला लागली आणि तो अस्वस्थ झाला.

इंडियन क्रो ने आपल्या ताकदीचा वापर करण्यासाठी गरूडावर चाल करण्याच ठरवल आणि तो प्रचंड रूपात गरूडावर चालून गेला.

त्याने गरुडाचे पंख कापले. गरूड घायाळ होऊन जमिनीवर कोसळला.

आणि मेल्याचं खोटं नाटक करून पडून राहायला.

गरुडच्या सोबत्यानी इंडियन क्रो ची माफी मागितली.

गरूड संपलाय समजून इंडियन क्रो शहराकडे निघाला.

इंडियन क्रो आठवणीतून बाहेर आला.

भाग-१२

आज इंडियन क्रोने बागेतल्या पिजऱ्यातल्या प्राण्यांची चौकशी केली.

त्यांच्या बरोबर कावळयांची पिल्ले त्याची मजा घेत होती.

वाघोबाजवळ जाऊन पिल्ले खेळली. वाघाने मोठी डरकाळी फोडली,

तशी भराभर उडून एका रांगेन पिंजऱ्यावर जाऊन बसली.

सिंहाच्या पाठीवर बसली तसे त्याने लगेच शेपटीने सगळयाना उडवून लावल.

इंडियन क्रो ने प्राण्यांना प्रश्न केला.

इंडियन क्रो "तुम्ही खूप मजेत दिसता बुवा!

सकाळी पुढयात मांस, फळे, अन्न वाढले जाते.

येणारे माणसे केळी खायला घालतात.

वाघोबा, तुम्ही तर , जंगलातले तुम्ही राजे आहात तर मग पिंजऱ्यातून उडी मारुन जा".

वाघाने डरकाळी फोडली " पिंजऱ्यात राहून आळस आलाय. जंगलात स्वत: ची शिकार स्वत: करायची. तुम्ही काही मदत करू शकाल का?"

इंडियन क्रोला त्या लहान मुलाची आठवण आली.
त्याचे वडील त्याच बागेत कामाला आहेत.
इंडियन क्रो तिथून या मुलाच्या घरी निघाला.
त्याने त्या मुलाला त्याची कल्पना सांगितली.
मुलाने त्याचा तो निरोप वडिलांना सांगितला.

भाग-१३

डोंगर पोखरण्यासाठी माणसे सुरुंग वर सुरुंग लावत होते.
गरुडे त्या आवाजानी बेजार झाली होती.
“हे कधीतरी संपणार आहे का?” म्हणून चिडत होती.

दिवसभर त्या आवाजाने पक्षी शहरात फिरून कावळे आणि इतर पक्ष्याना त्रास देत. कचऱ्याच्या ढिगाऱ्यांवर घारी अन्न शोधत.

एक दिवस इंडियन क्रो बागेत पुन्हा परत आला.

बागेतल्या प्राण्यांना आज मुक्त सोडण्यात येणार होते.

बागेत अशा प्रकारे योजनां करण्यात आली होती की प्राणी मुक्त फिरतील आणि माणसांना पिंजऱ्यातून त्यांचे दर्शन मिळणार होते.

डोंगरातले सुरुंग ही वन खात्याने बंद केले होते. आता गरुडाना निवांतपणा मिळणार होता.

इंडियन क्रो ने मुलाला संगितेली युक्ती त्याच्या वडिलांनी वन अधिकारी असल्याने वापरली होती.

प्राणी खुश होते.

त्यानी इंडियन क्रो चे आभार मानले.

भाग- १४

इंडियन क्रो आता शहरात रुळला होता. त्याने आता आपले प्रयोजन कावळयांच्या सभेत सांगायचे ठरवले.

कावळयांच्या प्रशिक्षणाची   चाचणी  ही घेण्यात येणार होती.

कावळयांची सभा बागेत  भरली.

कावळयांनी वेग-वेगळया चाचण्या करून दाखवल्या.
आणि अचानक एक साप भर सभेत येऊन पडला.

गरुडाने  तो वरुन टाकला आणि सभेत येऊन मधेच उभा राहिला.

आणि आणि गर्जला “कावळयांनो हा माझा शत्रू मला द्या. ”

लीडर गर्जला ”नाही तो आमचा पाहुणा आहे”

तरीही इंडियन क्रोवर हल्ला करण्यात गरूड यशस्वी झाला.
इंडियन क्रोशी झडपड सुरू झाली.
इंडियन  क्रो, गरूड राजा दोघे ही आकाशात उडाले.
आणि युद्ध सुरू झाले.
इंडियन क्रोने उंचावरून खाली जमिनीवर झेप घेतली.
इंडियन क्रोची दूरवर नजर गेली.

एक प्रचंड पक्षी गरूडावर हल्ला करताना दिसला.
कावळे  कुठे दिसेनासे झाले होते.
गरूड राजा ही गडबडला.

त्या प्रचंड पक्षाने गरूडावर हल्ला केला होता.

गरूड राजा पुन्हा एकदा खाली कोसळला पण ह्या वेळी तो जमिनीवर आदळला.
पण उडू शकत नव्हता. त्याच अंत झाला होता.
हे सगळे इंडियन क्रो बघत होता.

कावळयांनी पक्षाचं प्रचंड रूप धारण केल होत. इंडियन क्रोला एक वेळ अस वाटल की ते त्याचं आगळं वेगळ रूप आहे.

सगळे कावळे  त्या मृत गरुडाच्या भोवताली उभे राहीले.

इंडियन क्रो ने कावळयांचे अभिनंदन केले.
त्याला कळले की कावळयांना त्यांच्या एकीचे बळ माहीत आहे.
अजूनही ते विसरले नाहीत.
लीडरने त्यांना ओळखले होते.
पण आता उपयोग नव्हता. इंडियन क्रोचे कुटुंब गिधाडांच्या हल्ल्यात जंगलात शहीद झाले होते. लीडर ने जुन्या आठवणी ताज्या केल्या.

इंडियन क्रोने कावळयांचा निरोप घ्यायचे ठरवले”
“इथे आता माझं काही काम नाही. पण तुम्हाला बघून आनंद झाला.

सगळे बदलले आहे. हे शहरच आता कावळयांचे घर आहे.

तुम्ही ह्या शहराचे झाले आहात”

इंडियन क्रो ने प्रचंड रूप धारण केले आणि तो उंच आकाशात उडाला.

जाता जाता त्याचे लक्ष त्या लहान छोट्या दोस्ताकडे गेले आणि त्याने तो हिरा त्याच्या स्वाधीन केला आणि निरोप घेतला”

त्याचं काम झालं होतं. त्याने तो हिरा माणसाच्या स्वाधीन केला होता.

समाप्त

Indian Crow
sudhirmarathe102@gmail.com

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.